# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** उस्मानाबाद **P.S.(ठाणे):** आनंदनगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0350 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**07/09/2023 21:06

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 19/05/2023
**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 19/05/2023
**Time From (वेळेपासून):** 11:18 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:33 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 07/09/2023 **Time (वेळ):** 19:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 033

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/09/2023 20:02 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय, ,उस्मानाबाद येथ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** नागेश लिंबाजी जगदाळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1975

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा इंगळे गल्ली उस्मानाबाद,ता जि उस्मानाबाद ,आनंदनगर,उस्मानाबाद, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा इंगळे गल्ली उस्मानाबाद,ता जि उस्मानाबाद ,आनंदनगर,उस्मानाबाद, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9371930309

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजाराम ईरन्ना केलुरकर | | | 1. बंडा गल्ली देगलुर तादेगलुर ,जि नांदेड सध्याचा पत्ता लक्ष, लक्ष्मीधाम कलनी,लातुर , आनंदनगर,उस्मानाबाद,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद  दि.07/09/2023

मी नागेश लिंबाजी जगदाळे, वय 48 वर्ष, व्यवसाय शेती व रास्त धान्य दुकान रा. इंगळे गल्ली उस्मानाबाद ता. जि. उस्मानाबाद मोबाईल नंबर 9371930309.

आज रोजी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथे हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहून शेती व रास्त धान्य दुकानाचा व्यवसाय करीत आहे. दिनांक 19.05.2023 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथे हजर राहून तक्रार दिली होती. त्यामधील थोडक्यात हकिगत अशी की, " माझे नावे महादेव गल्ली, उस्मानाबाद येथे शासन मान्य रास्त धान्य दुकान असून त्याचा क्रमांक 17 आहे. सदरचे दुकान मी चालवत असून शेती व्यवसाय देखील करीत आहे.

तहसिल कार्यालय उस्मानाबाद जि. उस्मानाबाद येथे पुरवठा नायब तहसिलदार श्री. राजाराम केलूरकर हे असून ते रास्त धान्य दुकानदारांकडून मागणी पत्रावर सहया करण्यासाठी प्रती महिना 1,000/- रूपये हप्ता म्हणून घेत आहेत. त्यांना प्रती महीना 1,000/- रूपये हप्ता न दिल्यास ते मागणी पत्रावर सहया करीत नाहीत व रास्त धान्य दुकानदारांना तुमच्या दुकानावर कारवाई करून दुकानाचा परवाना रद्द होण्यासाठी प्रस्ताव पाठविन असे म्हणतात. त्यांनी मागणी पत्रावर सही केली नाही तर आम्हला धान्य मिळत नाही. त्यामुळे त्यांचे मागणी प्रमाणे त्यांना मी व माझे मित्र जगदाळे, साळूंके असे प्रती महिना 1,000/- रूपये हप्ता देत होतोत. परंतू गेल्या तीन महिन्यापासून आमचे आर्थीक अडचणीमुळे आम्ही त्यांना हप्ता देवू शकलो नाहीत.

गेल्या आठ दिवसापुर्वी तहसिल कार्यालय, उस्मानाबाद येथे मी माझे रास्त धान्य दुकानाचे कामासाठी गेलो असता तेथे पुरवठा नायब तहसिलदार श्री. राजाराम केलूरकर यांची व माझी भेट झाली. त्यावेळी ते मला गेल्या तीन महीन्यापासून तुम्ही व तुमचे मित्र जगदाळे, साळुंके यांनी हप्ता दिलेला नाही. तुमच्याकडे तीन महीन्याचा हप्ता बाकी आहे. तुम्ही तिघांनी मिळून तीन महीन्याचे 9,000/- रूपये दिले नाही तर मी तुमच्या धान्य मागणी पत्रावर सही करणार नाही व तुमच्या दुकानावर कारवाई करून तुमच्या दुकानाचा परवाना रद्द करण्यासाठी प्रस्ताव पाठविल असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना साहेब आमच्या अडचणीमुळे आम्ही तुम्हाला तीन महिन्यापासून पैसे देवू शकलो नाहीत आम्हला संभाळून घ्या असे म्हणालो, परंतू त्यांनी माझे काहीएक ऐकून घेतले नाही व ते माझ्यापासून निघून गेले. त्यानंतर मी त्यांचेपासून निघून माझे घरी गेलो.

पुरवठा नायब तहसिलदार श्री. राजाराम केलूरकर यांनी माझ्याकडे तिघांचे मिळून मागणी केलेले 9,000/- रूपये ही कोणतीही शासकीय फिस नसून ती लाचच असल्याची माझी खात्री झाली आहे. मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही " वगैरे मजकुरची तक्रार म्हेत्रे साहेब, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद यांच्याकडे दिली व त्यांनी माझी तक्रार पोकॉ/ शेरकर यांना प्रतिवेदीत केली. त्यावरुन पोकॉ शेरकर यांनी माझी तक्रार संगणकावर टंकलिखीत करुन त्याची प्रिंट काढली. त्यानंतर त्यांनी माझी संगणकावर टंकलिखीत केलेली तक्रार व मी तोंडी सांगितलेली तक्रार एकच असल्याची खात्री झाल्यानंतर मी त्यांनी व उपस्थित पंचांनी त्यावर सहया केल्या.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक म्हेत्रे साहेब यांनी मला कळविले की, माझ्या तक्रारीचे अनुषंगाने पुरवठा नायब तहसिलदार श्री. राजाराम केलूरकर हे माझे तक्रारीमधील नमुद कामासाठी माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे? याबाबत त्यांची पंचासमक्ष तहसिल कार्यालय, उस्मानाबाद येथे जावून लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याबाबत खुलासा करुन लाचमागणी पडताळणी दरम्यान त्यांची लाचेची मागणी सिध्द झाल्यास लाचेचा सापळा आयोजीत करण्यात येईल असे सांगितले. तसेच त्यांनी दोन्ही पंचांची पंच म्हणून काम करण्याची सहमती घेवुन सदानंद गोविंद कुरूकवाड, वय 31 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद- सहाय्यक अभियंता (वर्ग-2) बांधकाम विभाग,



Scanned with CamScanner

उस्मानाबाद यांची पंच क्र. 1 म्हणुन व उमेश पंडीत कांबळे, वय 41 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद- स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक (वर्ग-3) बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांची पंच क्र. 2 म्हणुन नेमणुक केली

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला कळविले की, लाचमागणी पडताळणी दरम्यान व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार आहे. त्यानंतर त्यांनी पोकाँ/ बेळे यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे पोकाँ/बेळे यांनी त्यांचेजवळील काळया रंगाच्या बॅगमधुन व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढुन त्याबाबत मला व दोन्ही पंचाना सविस्तर माहिती देवुन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखविले व एक नवीन मेमरी कार्ड व्हॉइस रेकॉर्डरमध्ये टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण रेकॉर्ड नसलेबाबत खात्री करुन दिली. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी माझे तसेच श्री. राजाराम केलूरकर यांचेत होणारे संभाषण व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्ड मध्ये रेकॉर्ड होणार असलेबाबत सांगितले.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला श्री. राजाराम केलूरकर यांची भेट कोठे होईल? याबाबत विचारले असता मी त्यांना श्री. राजाराम केलूरकर यांची भेट तहसिल कार्यालय, उस्मानाबाद येथे होईल असे सांगितले, तेव्हा म्हेत्रे साहेब यांनी लाचमागणी पडताळणीच्या अनुषंगाने मला सुचना दिली की, मी पंच क्र. 1 यांचेसह तहसिल कार्यालय, उस्मानाबाद येथे जावुन श्री. राजाराम केलूरकर यांची पंचासमक्ष भेट घेवुन त्यांना आपले तक्रारीमधील नमुद कामासंदर्भाने बोलावे. त्यासाठी त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांच्याकडुन वेळ मागुन घेवुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत यावे. तसेच त्यांनी पंचांनाही लाचमागणी पडताळणीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर त्यांनी पोकाँ/ बेळे यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे त्यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टचे आतमध्ये डावे बाजुस बनियनला पिनने लावुन मला व पंच क्र. कुरूकवाड यांना माझेकडील मोटार सायकल क्रमांक MH 25 AT 4999 ने श्री. राजाराम केलूरकर यांची भेट घेण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथून तहसिल कार्यालय उस्मानाबादकडे 11.18 वा. रवाना केले, त्याप्रमाणे मी व पंच क्र. 1 कुरूकवाड असे माझेकडील मोटार सायकलने रवाना होवुन तहसिल कार्यालय, उस्मानाबाद येथे गेलो. तेथे मोटार सायकल बाजुला लावून तेथून मी व पंच कुरूकवाड पायी चालत उस्मानाबाद येथील तहसिल कार्यालयात जात असताना तेथील पोर्चमध्ये श्री. राजाराम केलूरकर यांची व आमची भेट झाली. त्यावेळी तेथे श्री. राजाराम केलूरकर यांचेत व माझेत बोलणे झाले. तेव्हा श्री. राजाराम केलूरकर हे मला ते भेट घेईनाच काही नाही दोघं तिघ तुम्ही काय.. दोघं तिघं भेट घेत नाहीत.. काय म्हणल बंद करून टाकल असे म्हणाले. तेंव्हा मी त्यांना काय बंद केल असे म्हणुन विचारले असता ते आमचं देणे असे म्हणाले. त्यानंतर मी त्यांना देणं बंद केल असे म्हणुन विचारले असता ते मला हं. चार महिने झाल.. ती तर नाहीत कुठं आलेत असे म्हणाले. तेंव्हा मी त्यांना किती राहिले असे म्हणुन विचारले असता ते मला तीन महिने झालं आल नाही.. चौथा महिना चालू होतय असे म्हणाले, त्यावर मी त्यांना आता किती असे म्हणुन विचारले असता ते मला त्याला महितेय की त्याला.. तुम्हाला माहितीय तीन महिने तिघांच आहे असे म्हणाले. तेंव्हा मी त्यांना हं. म्हणजे माझ्या एकटयाचे राहिले का.. असे म्हणुन विचारले असता त्यांनी तिघांचे राहील्याचे सांगितले. तेंव्हा मी त्यांना तीन हजार असे म्हणुन विचारले असता त्यांनी तिघाचे राहिल्याचे सांगितले. त्यानंतर मी त्यांना नऊ हजार दिले नाही का, असे म्हणुन विचारले असता ते मला हं.. तिघाचे राहिले असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना माझे मी देतो असे म्हणालेवर ते मला त्याचा काही विषय नको मला काही गरज नाही, मला रुपयाबी नकोय असे म्हणाले व त्यांनी माझ्या सोबत असलेल्या पंचाबाबत विचारणा केली. तेंव्हा मी त्यांना ते माझे कामावरील सुपरवायझर असल्याचे सांगितले. त्यावेळी श्री. राजाराम केलूरकर यांनी माझ्याकडे प्रथम आम्हा तिघांचे तिन महिन्याचे राहीलेल्या 9,000/- रुपयाची मागणी केली व नंतर त्यांना माझ्या सोबत असलेल्या पंचाबाबत संशय आल्याने त्यांनी नकार दिला. त्यानंतर श्री. राजाराम केलूरकर हे घाई गडबडीत मिटींगसाठी जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबादकडे गेले व मी आणि पंच माझ्याकडील मोटार सायकलने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथे 11.33 वा. परत आलोत.

त्यानंतर पोकाँ/ बेळे यांनी माझ्या जवळील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद करुन म्हेत्रे साहेबांकडे दिला. तेव्हा म्हेत्रे साहेब यांनी मला लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथील दुस-या रूममध्ये जावुन थांबण्याची सुचना केल्याने मी दुस-या रूममध्ये जावून थांबलो. त्यानंतर काही वेळाने मला मे साहेब यांनी बोलावून घेवून हकीकत विचारली असता मी वरील प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर त्यांचे सुचनेवरून पोकाँ/बेळे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामधील लाचमागणी संदर्भाने महत्वाचे संभाषण माझे व दोन्ही पंचासमक्ष ऐकले व संभाषणाबाबत मला तसेच पंचांना विचारपुस केली.

दिनांक 19.05.2023 रोजी झालेल्या लाचमागणी पडताळणी कारवाई वेळी श्री. राजाराम केलूरकर, पुरवठा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, उस्मानाबाद यांनी माझ्याकडे सुरूवातीला लाचेची मागणी केल्याचे व नंतर नकार दिल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे मी म्हेत्रे साहेब यांना श्री. राजाराम केलूरकर हे मला काही दिवसांनी



Scanned with CamScanner

बोलावतील आपण काही दिवस थांबुन राहु अशी विनंती केली होती.

त्यानंतर जुन/ 2023 मध्ये श्री. राजाराम केलूरकर यांची उमरगा येथे बदली झाल्याचे मला समजले व त्या दरम्यान त्यांनी मला भेटण्यासाठी बोलाविले नाही. त्यामुळे मी दिनांक 21.08.2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथे हजर येवुन म्हेत्रे साहेब यांची भेट घेवुन त्यांना श्री. राजाराम केलूरकर यांची उमरगा येथे बदली झालेली असुन आज पर्यंत त्यांनी मला भेटण्यासाठी बोलाविले नाही. तरी आपण दिनांक 22.08.2023 रोजी सकाळी लवकर उमरगा येथे जावून त्यांची भेट घेवू असे सांगितले. त्यानंतर दिनांक 22.08.2023 रोजी श्री. राजाराम केलूरकर हे उमरगा येथे हजर नसलेबाबत मला माहिती मिळाल्याने तशी माहिती मी म्हेत्रे साहेब यांना दिली.

त्यानंतर दिनांक 04.09.2023 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथे हजर येवुन म्हेत्रे साहेब यांची भेट घेवुन त्यांना श्री राजाराम केलूरकर हे उमरगा येथे असल्याचे सांगितले. त्यावरून म्हेत्रे साहेब यांनी पुर्वीचे दोन शासकीय पंचाना पत्र देवून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथे बोलावुन घेतले. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथुन म्हेत्रे साहेब यांचेसोबत मी, दोन पंच व सापळा पथक असे दोन खाजगी वाहनाने रवाना होवुन उमरगा येथे पोहचुन हैद्राबादकडे जाणारे बायपास रोडला एका सुरक्षीत ठिकाणी जावुन थांबलो.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी दिनांक 19.05.2023 रोजी लाचमागणी पडताळणी कारवाईचे अनुषंगाने दिलेल्या सुचनांची आज रोजी पुन्हा आम्हास उजळणी करून दिली व पोकाँ/बेळे यांनी सोबत आणलेल्या काळ्या रंगाच्या बॅगमधुन व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढुन त्याबाबत मला व दोन्ही पंचाना सविस्तर माहिती देवुन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखविले व एक नवीन मेमरी कार्ड व्हॉइस रेकॉर्डरमध्ये टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण रेकॉर्ड नसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी माझे तसेच श्री. राजाराम केलूरकर यांचेत होणारे संभाषण व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्ड मध्ये रेकॉर्ड होणार असलेबाबत सांगितले.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला श्री. राजाराम केलूरकर यांची भेट कोठे होईल? याबाबत विचारले असता मी त्यांना श्री. राजाराम केलूरकर यांची भेट तहसिल कार्यालय, उमरगा येथे होईल असे सांगितले. तेव्हा म्हेत्रे साहेब यांनी लाचमागणी पडताळणीच्या अनुषंगाने मला सुचना दिली की, मी पंच क्र. 1 सदानंद कुरूकवाड यांचेसह तहसिल कार्यालय, उमरगा येथे जावुन श्री. राजाराम केलूरकर यांची पंचासमक्ष भेट घेवुन त्यांना आपले तक्रारीमधील नमुद कामासंदर्भाने बोलावे. त्यासाठी त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांच्याकडुन वेळ मागुन घेवुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत यावे. तसेच त्यांनी पंचांनाही लाचमागणी पडताळणीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर त्यांनी पोकाँ/ बेळे यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे त्यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टचे आतमध्ये डावे बाजुस बनियनला पिनने लावुन मला व पंच क्रं. कुरूकवाड यांना सोबत आणलेले खाजगी चारचाकी वाहन क्रमांक MH 12 SF 4576 मधुन श्री. राजाराम केलूरकर यांची भेट घेण्यासाठी सापळा पथक थांबलेल्या ठिकाणावरुन तहसिल कार्यालय, उमरगाकडे 13.51 वा. रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच क्र. 1 कुरूकवाड असे खाजगी वाहनामधुन रवाना होवुन तहसिल कार्यालय, उमरगा येथे गेलो. तेथे पार्किंगमध्ये खाजगी वाहन लावून तेथून मी व पंच कुरूकवाड पायी चालत तहसिल कार्यालय, उमरगा येथे गेलो. त्यावेळी तेथे श्री. राजाराम केलूरकर हे न दिसल्याने तेथील उपस्थित कर्मचारी यांना श्री. राजाराम केलूरकर यांचेबाबत विचारले असता त्यांनी ते उस्मानाबाद येथे मिटींगसाठी गेल्याचे सांगितले. त्यानंतर मी माझा मोबाईल क्रमांक 9371930309 वरून श्री. राजाराम केलूरकर
यांचा मोबाईल क्रमांक 8329828391 वर त्यांना फोन लावुन स्पिकर ऑन करून विचारले असता त्यांनी ते उस्मानाबाद येथे मिटींगसाठी आल्याचे सांगितले. तेंव्हा मी त्याना नाराज आहेत का? असे म्हणून विचारले असता ते मला तुम्ही जाता जाता आम्हाला अडकवण्याचा प्रयत्न केलातात.. मला क्षिरसागरनं क्लिअरकट सांगितल, तुम्हाला अडकवण्याचा प्रयत्न केला होता म्हणुन.. हे बघा देणे घेणे नाही आता.. विषय नाही.. पण मी तुम्हाला कुठलच त्रास दिला नाही.. असे बोलून नंतर त्यांनी फोन कट केला. त्यानंतर मी व पंच खाजगी वाहनामधुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 14.18 वा. परत आलोत.

त्यानंतर पोकाँ/ बेळे यांनी माझ्या जवळील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद करुन म्हेत्रे साहेबांकडे दिला, तेव्हा म्हेत्रे साहेब यांनी मला तेथे बाजुला जावुन थांबण्याची सुचना केल्याने मी तेथे बाजुला जावुन थांबलो. त्यानंतर काही वेळाने मला म्हेत्रे साहेब यांनी त्यांचेजवळ बोलावुन घेवुन हकीकत विचारली असता मी त्यांना वरील प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर त्यांचे सुचनेवरून पोकाँ/बेळे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामधील लाचमागणी संदर्भाने महत्वाचे संभाषण माझे व दोन्ही पंचासमक्ष ऐकले व संभाषणाबाबत मला तसेच पंचांना विचारपुस केली.

दिनांक 04.09.2023 रोजी झालेल्या लाचमागणी पडताळणी कारवाईवरून श्री. राजाराम केलूरकर यांना माझा



Scanned with CamScanner

संशय आल्याने ते यापुढे माझ्याकडे लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारणार नाहीत याची मला खात्री झाली.

आज रोजी श्री. राजाराम केलूरकर, पुरवठा नायब तहसिलदार यांचे नावाबाबत आम्ही माहिती घेतली असता त्यांचे संपुर्ण नाव राजाराम ईरन्ना केलूरकर, वय 56 वर्ष, तत्कालीन पुरवठा नायब तहसिलदार, उस्मानाबाद सध्या नेमणुक तहसिल कार्यालय, उमरगा जि.उस्मानाबाद (वर्ग-02), मुळ रा. बंडा गल्ली, देगलूर ता. देगलूर जि.नांदेड सध्याचा पत्ता लक्ष्मीधाम कॉलनी, आई निवास, लातूर जि.लातूर असे असल्याचे समजले आहे.

तरी दिनांक 19.05.2023 रोजी तहसिल कार्यालय, उस्मानाबाद येथे श्री. राजाराम केलूरकर यांनी माझे व माझे मित्र जगदाळे, सांळुके यांचे रास्त भाव दुकानाचे धान्य मागणी पत्रावर सहया करण्यासाठी व दुकानावर कोणतीही कारवाई न करण्यासाठी तिघांचा तिन महीन्याचा हप्ता राहील्याचे सांगून माझ्याकडे तिघांचे मिळून एकुण 9,000/- रुपये लाचेची मागणी केलेली आहे. त्यामुळे राजाराम ईरन्ना केलूरकर, वय 56 वर्षे, तत्कालीन पुरवठा नायब तहसिलदार, उस्मानाबाद सध्या नेमणुक तहसिल कार्यालय, उमरगा जि. उस्मानाबाद (वर्ग-02) मुळ रा. बंडा गल्ली, देगलूर ता. देगलूर जि.नांदेड सध्याचा पत्ता लक्ष्मीधाम कॉलनी, आई निवास, लातूर जि.लातूर यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यासाठी मी माझी फिर्याद देत असुन सदरची फिर्याद मी वाचून पाहिली, ती बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

PRAVINKUMAR YUVRAJ BANGAR(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with CamScanner

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** PRAVINKUMAR YUVF
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस ठाणे
आनंद नगर, उस्मानाबाद



Scanned with CamScanner